Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# लोकसाहित्यातील– लोकनाटय

विलास खुणे
शिवाजी महाविद्यालय धानोरा रोड गडचिरोली

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**
लोकनाट्यत पुष्कळदा पौराणिक ऐतिहासिक किंवा लोककथांवर आधारलेल्या विषयांवरील नाट्य चालू असता या प्राचीन विषयांची समकालीन विषयांशी सांगड घालण्यात येते. लोकनाट्यतील सूत्रधार व विदुषक सदृश विनोदी पात्रांची ही एक विशेष लकब असते. विषय व वातावरण प्राचीन परंतु त्यात समकालीन राजकारण व समाजकारण यातील एखाद्या ठळक घटनेवर ही पात्रे सहजच विनोदपूर्ण टिकाटिप्पणी करुन जातात. अशा वेळी ती प्रेक्षकांकडे वळून त्यांच्याशी गप्पा मारल्यासारखे करतात. त्यायोगे नट व प्रेक्षक यामध्ये एक प्रकारचा सहज संवाद निर्माण होतो. भिन्न भिन्न काळात प्रचलीत असलेल्या सामाजिक घटनांची व प्रश्नांची अशा रीतीने प्राचीन विषयांशी सांगड सहजगत्या घातली जात असल्यामुळे कुटल्या काळात लोकनाट्यांचा ताजेपणा व आवाहन कायम राहतात तसेच लोकनाट्यतून केला जाणारा स्थूल का होईना पण नैतिकबोध ग्रामीण जनात लोकप्रिय होण्याला कारणीभूत ठरतो.
सारांश, लोकनाट्य हा ग्रामीण जनांची नैतिक, भावनात्मक व रंजनात्मक अशा विविध प्रकारची भूक भागविणारा किंबहूना त्यांच्या समग्र आंतर व्यक्तीमत्वास व्यापून टाकणारा करमणूक प्रकार आहे. केवळ करमणूक प्रकारच नव्हे तर एक प्रकारचा संपूर्ण भावनिक अनुभव आहे. त्यायोगे त्याचे आकर्षक कमी होणारे नाही.
**मुख्यशब्द** : लोकनाट्य, तमाशा, भारुड गोंधळ, ललिते, सामाजिकता, संस्कृती, लोकरंजन, धार्मिक विधी.

**प्रस्तावना :**

लोकनाट्य हे दृश्य व श्राव्य नाट्य आहे. ते साहित्य गुणांनी युक्त असे पाठ्य नाटक नाही. त्यांचे सारे यश त्याच्या प्रयोग पध्दतीत आहे. सर्वांना समजणारी नित्याच्या व्यवहारातील साधीबोली, तुटपुंजी सजावट, कृत्रिमतेचा स्पर्शही न झालेला सरळसोट अभिनय, सामन्य जनास रुचणारे संगीत व नृत्य या सहजसाध्य साधनांचा उपयोग करून बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व करणारे लोकनाट्य शतकानुशतके सामान्य जनांचे समाराधन करीत आले आहेत. संस्कृत, सुविद्य लेखकांनी लिहिलेले नागरी नाटक विशिष्ट वर्गाच्या मनोरंजनाची गरज भागविते तर ग्रामीण लोकनाट्य बहुजन समाजाच्या इच्छा– आकांक्षाशी एकरुप झालेले असल्यामुळे त्यांचे खरे मनोगत व्यक्त करते. सामान्य जनांनी सामान्या जनांसाठी निर्माण केलेली ती कला आहे. परिस्थितीनुसार ते शिळे होऊन जाते, तर बहुजन समाजाच्या मनोभूमित खोलवर रुजलेले लोकनाट्य प्रतिकूल परिस्थितीचा झंझावात अंगावरुन गेला तरी तग धरुन राहते. इतकेच नव्हे तर ताजे टवटवीत राहते अशी इतिहासाची साक्ष आहे.

**लोकसाहित्यातील लोकनाट्यचे विविध प्रकार :–**

**१) तमाशा :–**

तमाशा हा शुद्ध मुसलमानांच्या संपर्कामुळे रुढ झाला. मराठेशाहीच्या सुबतेच्या आणि शांततेच्या काळात चैनीचे आणि करमणुकीचे जे प्रकार प्रचारात आले त्यात तमाशाची गणना होते. अठराव्या शतकात तत्कालीन परिस्थितीमुळे तमाशाला एक विशिष्ट स्वरुप प्राप्त झाले. व त्याच सुमारास या नाट्य प्रकारचे 'तमाशा' हे नाव प्रचलित झाले. परंतु ह्य सुरुवातीच्या तमाशात ज्या ज्या गोष्टींचा अंतर्भाव होत असे. त्या मात्र पुष्कळ दिवसांपासून चालत आलेल्या होत्या. दशावतार, ललित, दंडार, अशी जी करमणुकीची परंपरा महाराष्ट्रात चालू झाली होती तिच्यातून तमाशा उद्भवला. तमाशाच्या प्रारंभी जो गण आणि गणानंतर ज्या गवळणी म्हटल्या जात असत त्यानंतर तमाशात येणारा 'लावणी' हा काव्य प्रकार पेशवाईतच उद्याला आला. याचबरोबर पोवाडे व कवेनही म्हणण्यात

येत असत. त्यांची परंपरा मात्र लावणीपेक्षा बरीच जुनी आहे. तमाशात सोंगाडया नावाचे स्वतंत्र पात्र येऊ लागले. विदुषकासारखे निखळ विनोदी असे हे पात्र पूर्वीच्या कोणत्याही करमणुकीच्या प्रकारात नव्हते. परंतु निरनिराळी सोंगे घेऊन प्रेक्षकांना हसविणारी दुय्यम पात्रे पूर्वी होतीच. अशा पात्रांचे महत्व सांगून सोंगाडयाला तमाशात स्वतंत्र स्थान देण्यात आले व कालांतराने ते इतके महत्वाचे ठरले की, तमाशाची मदारच त्या पात्रावर येऊन ठेपली. सोंगाडयाचे काम कल्पकतेचे असून त्यायोगेच तमाशाच्या असाधारण जिवंतपणा दिसून येतो.

**२) वग :—**

तमाशाच्या तंत्रात झालेला हा एक बदल म्हणजे तमाशात वगाचा समावेश हा होता. वग म्हणजे नाटकातल्या प्रमाणेच संवाद होतं. नाटकांतील गाण्याचा प्रभाव, तमाशातील वगाची प्रथा पाहता असे वाटते की, नाटकाने गाण्याची प्रथा तमाशावरुन उचलली. तर तमाशाने वगातील संवादातील प्रथा नाटकावरुन उचलली. या दृष्टीने आधुनिक तमाशा म्हणजे पेशवाईतील तमाशाचे नाटकावर केलेले कलम होय. महाराष्ट्रातील रसिकास लावणीची चटक इतकी जबरदस्त होती की, नाटकांच्या रंगभूमीवरही पुढे कित्येक स्वरदेवतेचे स्वराज्य अबाधितपणे चालू राहिले. तमाशाचा जिवंतपणा प्रसंगनिष्ठ विनोदातच आहे.

**३) दंडार :—**

दंडार हा ग्रामीण जनजीवनाचा धर्मविधी आणि लोकरंजनाचाही महत्वाचा नाटयप्रकार आहे. दिवाळीच्या सणाला शेतीमध्ये राबणारा मजूर आणि कास्तकार यावेळी काहीसा चैनीत असतो. थोडाबहुत पैसाही त्याच्या हातात खेळत असतो आणि दिवाळी ही अनेक सांस्कृतिक संबंधानी त्याच्या जीवनात प्रवेशात असते. दिवाळीचा उत्सव रामाच्या जीवनाची आणि कृष्णाच्याही चरित्राशी जोडला जातो.

दंडार या शब्दाचा अर्थ टाळांचा खेळ असा आहे. दिवाळीपूर्वीच्या पितृमोक्ष अमावस्येपासून दंडारीच्या तालमीचे नारळ फुटतात. नाट्यप्रयोगासाठी घेतलेल्या मांडवात येण्यासाठी ही सर्व मंडळी मारुतीच्या दर्शनाला जातात. यावेळी, दंडाराचा खेळ विश्वपतीचे गुढ सांगणारा आहे. कृष्ण या खेळाचा प्रारंभ करतो. ब्रम्हा, विष्णु, महेश हे क्रमाने विश्वनिर्मिती, विश्वसंचालन आणि विश्वविलय करीत असतात.

दंडारामध्ये प्रमुख रस शृंगार असतो. करुण, वीर असेही रस येतात. दंडार या लोकनाट्यत अनेक लघुनाट्ये सामावलेली असतात. दंडार एक उत्सव, एक आनंद म्हणूनच मोटया उत्सवाने साजरा करतात. विदर्भातील प्रधान लोकनाट्य म्हणजे दंडार होय.

**४) गोंधळ :—**

गोंधळ हा शब्द गडबड, धांदल, विचका या अर्थानी वापरण्यात येतो. शंकराच्या गणांना वा भक्तांना दल म्हटले जाई. या गणदलाने शंकराच्या पुजेचा रुढ केलेला प्रकार म्हणजे 'गणदल' होय. गणदल—गंदल—गोंदल—गोंधळ असा गोंधळ शब्द आला. शंकर भक्तीचा पुरावा म्हणूनच गोंधळामध्ये त्रिशुल, डमरु,रुद्राक्ष यांना महत्वाचे स्थान मिळाले आहे. गोंधळाचा संबंध असा मूलत: शंकराच्या उपासनेशी आहे. पण इ.स. पूर्व सुमारे १००० वर्षाच्या पासून गोंधळ देवीच्या उपासनेशी निगडीत झाला. ही देवी म्हणजे रेणुका वा जगदंबा होय. बहुदेवतावादाच्या अराजकात तिच्याविषयी वाद नव्हते. अशी भूतमाता ही मातृपुजकांच्या परंपरेतील देवता उपास्य देवता मानण्यात आली.

परशुरामाने बेटासूराचा वध करुन त्याच्या शिराचे तुणतुणे करुन रेणुकेजवळ त्याने आपल्या पराक्रमाचे प्रदर्शन केले. आईला अभिवादन केले. हाच गोंधळाचा उगम मानला जाते. इ.स. पूर्व १००० पासून रेणुकेचा ग्रामदेवता म्हणुन

लोकसंस्कृतीने स्वीकार केला गोंधळाचा उगम वरील भुतमातेशी जोडला जातो.

ज्ञानेश्वरीतील गोंधळ हा शद्ध भूतपिशाच्च या अर्थान येतो. यावरुन आदिम काळात गोंधळ हे भूतमातेच्या भूतगणांचे एक उपासना नृत्य असावे. भूत हा तत्कालीन लोकसमुह होतो व तो आपल्या देवीला समुहांच्या नावाने संबोधीत असावा. भूतगणांची देवता अशी भूतमाता म्हणुन प्रसिद्धीस आली. पुढे रेणूकेचे महात्म्य वाढू लागले. पुढे भूतमातेलाच रेणूकेच्या रुपात लोकसंस्कृतीने पूजाविषय केले. रेणु म्हणजे मातीचे कण. मातीच्या कणांशी संबंधित देवता तीच भूतमाता होय. संदर्भाने सुकलीकरणाची देवता ठरते. या भूतमातेच्या महात्म्याशी रेणूकेचे चरित्र जोडले गेले. आणि गोंधळाचा उगम रेणुकेशी जोडला गेला.

**५) ळळीते :–**

ळळीताचा जन्म कीर्तनाशी निगडीत आहे. कीर्तनामधून विविध सोंगे दाखवून भक्ताचा महिमा सांगितला जात असे. पूढे कीर्तनातील सोंगाशी संबंधित भाग नाट्यरुपाने विकास पावला. या भागाशीच ललिताच्या जन्माचा संबंध आहे. रंजक आणि उद्‌बोधक शैलीने ज्या खेळातून शैलीने ज्या खेळातून देव–भक्ताच्या लीला सादर केल्या जातात त्या खेळाला ललित असे म्हणतात.

समाजावर धार्मिक संस्कार करण्याच्या प्रेरणेतून ललित जन्माला आले. ललिताने वेदांताचे निरुपण रंजकपणे केले. मुळात ललिताचा ज्ञानार्जन हा उद्देश नव्हता. ललित ही तत्कालीन संस्थाच होती. रंजन आणि धर्मशिक्षण ही त्यांची प्रकृती होती. भानदार, चोपदार, वासुदेव, दिंडी गाण, गोंधळी, वाघ्यामुरळी, इत्यादींच्या सोंगाबरोबरच देवादिकांचीही सोंगे आणि अवताराच्या लीला ललितामधून सादर केल्या जातात. ललिताचा शेवट बहुतांशी रावणाच्या वधाने होत असे. अलिकडच्या काळात सुरु झालेल्या पौराणिक नाटकाच्या मुळाशी ललित हा नाट्यप्रकारच आहे. पौराणिक नाटकाने ललितापासूनच साधनसामग्री मिळविली. सुत्रधार, नटी, पार्श्वगायक यांचा संबंध ललिताशीच आहे. ललितांनी इतर लोकनाट्य प्रकाराप्रमाणेच लोकसंस्कृतीचे भरण–पोषण केले आहे.

**६) भारुड –**

ज्ञानदेवांच्या काळापासून ते तुकारामाच्या काळापर्यंत भारुड आढळतो. भारुडाची व्याख्या लांबलचक, गुंतागुंतीची, कंटाळवाणी, वृत्तांत कथा, अवघड कूट कविता, लेख रुपक म्हणजे भारुड होय. (महाराष्ट्र ज्ञान कोश) अशी केली जाते. तिच्यातील कूट आणि रुपक हे शद्ध भारुडाच्या मूळ शद्बाची नेमकी निदर्शने करतात.

भारुड या शद्धाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगितला जातो. 'जे बहुरुढ आहे ते भारुड' असे सांगितले जाते. भारुड या द्विमुख पक्ष्याप्रमाणे व्यावहारिक व पारमार्थिक अशी दोन मुद्दे भारुडयाला असल्याने त्याला भारुड म्हटले जाते.

भारुडांचा उगमही ललितामध्ये असावा. ललितकारांनी प्रारंभी भारुडे सादर केली असावी. पण भारुडामध्ये गाण्याबरोबरच संपादनही होते आणि गायक एक गद्यपद्य मिश्रित किंवा चेपू प्रकृतीचे भारुड नृत्य करुन सादर करीत असत. काव्य, नृत्य, नाट्य अशा विविध आविष्कार माध्यमांच्या संमीलनातूल भारुड सिद्ध झाले आहे. अध्यात्माचा, परिपोष करण्यासाठी संतांनी भारुडाचे बहिरंग स्वीकारले. संताचीच भारुडे ही लोकवाङ्मयाच्या आणि लौकिंक वाङ्मयाच्या सीमेवरती पडतात. भारुड म्हणजे एक प्रकारचे नाट्यगीतच होय. श्रोत्यांना ते अंतर्मुख करीत असे. संतानी निर्माण केले भारुड द्विमुख असले तरी मूळ लोकसंस्कृतीतील भारुड एकमुखच असावे. लोकसंस्कृतीवर अध्यात्माचे कलम करण्यासाठी संतानी लोकसंस्कृतीच्या भारुड या बोलीचाच अवलंब केला. संताच्या भारुडामध्ये सांप्रदायिकता व तोचतोपणा आहे. विविध मनोभूमिकांची नाटके सादर करणारे भारुड हे बहुरुपी आहे. नानरुपी खेळ

असेही भारुडाचे वर्णन केले जाते. आणीबाणीच्या काळातही ललितकारांनीही लोकसंस्कृतीला जगण्याचे बळ दिले आणि इस्लामी राजवटीच्या काळात संतांनी समाजाला अध्यात्माचे बाळकडू पाजले आणि पुरातन धर्माचे पुनरुज्जीवर केले. भारुडातील नाट्यत्मकतेमुळे संतानाही आपले कार्य यशस्वीपणे करता आले. या नाट्यगुण सामर्थ्यामुळेच भारुडाला लोकनाट्य म्हणून ओळखावे लागते.

**निष्कर्ष :–**

१) लोकनाट्यचा उगम कुठल्यातरी धार्मिक उत्सवातून झालेला असतो.

२) त्यातील नाट्यसंगीत नृत्यप्रधान असते. गद्य संवाद लिखित स्वरुपात नसतात. नट ते संवाद स्वयंस्फुर्तीने म्हणतात.

३) लोकनाट्यत रंगमंच व इतर सजावट अगदी जुजबी असते. पण यामुळेच नट व प्रेक्षक यामध्ये एकप्रकारचा सहज संवाद उत्पन्न होतो. लोकनाट्यतील अभिनय सांकेतिक स्वरुपाचा असतो.

४) प्रत्येक लोकनाट्य प्रकारात कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सुरुवातीला नांदी व अखेरचे भरत वाक्य असतेच.

५) सूत्रधार व विदूषक ही पात्रे कोणत्या ना कोणत्या स्वरुपात असतातच. नाटक ही परंपरेने विकसित होत असलेली दृश्य श्राव्य कला आहे.

**संदर्भ :**

खडीगंमत : विदर्भाचे लोकलेणे – डॉ. हरिशचंद्र बोरकर

लोककला – डॉ. धोंडीराम वाडकर

लोक नागर रंगभूमी – डॉ. तारा भवाळकर

लोकनाट्यची परंपरा – डॉ. वि. कृ. जोशी